## औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस

| | | |
|---|---|---|
| पोलीस अधिक्षक, कार्यालय | **प्रेसनोट** | दिनांक १५/०७/२०१७ |

**प्रति,**
**सर्व सन्माननीय,**

पोलीस ठाणे फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण येथील गुन्हयामध्ये दिनांक १५/०७/२०१७ रोजी मा. जिल्हा सत्र न्यायालय,औरंगाबाद यांनी सदर गुन्हयांतील आरोपींना दोषी ठरवुन जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

सदर घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी नामे शेख गफार शेख गुलाब रा.नायगाव ता.फुलंब्री याने पोलीस स्टेशन फुलंब्री येथे दि.२७/०९/२०१४ रोजी फिर्याद दिली कि,इमस नामे सय्यद रहेमान सय्यद रुस्तुम वय ४७ वर्ष रा.नायगाव याची पत्नी नामे नजमाबी सय्यद रहेमान वय ३० वर्ष रा.नायगाव हिचे विनोद रंगनाथ पवार वय ३४ वर्ष रा.सावंगी याचेशी सुमारे एक वर्षापासुन अनैतिक संबध होते. नजमाबी व विनोद यांच्या अनैतिक संबधास अडथळा ठरत असलेला नजमाबी हिचा पती रहेमान याचा नजमाबी व विनोद याने काटा काढायचे ठरविले. त्यावरुन दि.२६/९/२०१४ ते २७/०९/२०१४ च्या रात्री सावंगी शिवारातील अमोल जगदाळे याचे कपाशीचे पिक असलेल्या शेतात मयत रहेमान यास गाठुन आरोपी विनोद व नजमाबी यांनी संगनमत करून लाकडाने मारहाण करून गंभीररित्या जखमी करून त्याचा खुन केला.

वरील प्रमाणे फिर्यादीचे तक्रारीवरून पो.स्टे. फुलंबी येथे गु.रं.नं. १३७/२०१४ कलम ३०२,२०१,३४ भादंवी प्रमाणे दि.२७/०९/१४ रोजी दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस उप निरीक्षक श्री.गायकवाड यांनी करून मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. या खटल्याची जिल्हा व अति.सत्र न्यायाधिश मा.महाजन साहेब यांचे समोर सुनावणी झाली असता सरकारी अभियोक्ता ॲड. श्री. बागुल यांनी सरकार तर्फे मा.न्यायालयात बाजु मांडली.मा.न्यायालयाने सदरच्या दोन्ही आरोपींना दोषी ठरवुन जन्मठेपीची शिक्षा व १०००० रूपये प्रत्येकी दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री.गायकवाड,शासकिय अभियोक्ता ॲड. बागुल, पैरवी अधिकारी पो.उप.निरीक्षक श्रीएजाज सिद्दीकी, सफौ शेख अन्वर,ने.पैरवी सत्र न्यायालय औरंगाबाद,पोलीस निरीक्षक श्री.महाजन,पैरवी मपोशि/खरात पोलीस ठाणे फुलंब्री यांचे डॉ.आरती सिंह, पोलीस अधीक्षक,औरंगाबाद ग्रामीण यांनी त्यांचे उल्लेखनिय कामगीरी बाबत अभिनदंन केले आहे.

**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करिता**